<u>नियमित दिवाणी दावा क्र.८८/२०२२</u>
<u>निशाणी क्र.४१ खालील आदेश</u>

**श्री. रामचंद्र धाकटू आवकिरकर आणि इतर १**
**विरुध्द**
**श्री. पांडूरंग नारायण आवकिरकर आणि इतर ११**

वादी यांनी प्रतिवादी क्र.१ विरुध्द जैसे थे परिस्थिती कायम ठेवण्याकरिता अर्ज दिला आहे. सदरचा अर्ज वाचला. त्यावरील प्रतिवादी क्र.१ तर्फे वकीलांचे म्हणणे ऐकले. वादी व प्रतिवादी क्र.१ यांच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

०२. वादी यांच्या कथनानुसार प्रतिवादी क्र.१ वादींच्या दावा मिळकतीत घराचे बांधकाम बेकायदेशीरपणे करीत आहेत. वादी यांनी दाव्यासोबत निशाणी क्र.४ अनुक्रमांक ४ येथे दावा मिळकतीची छायाचित्रे हजर केलेली आहेत. त्यांचे अवलोकन करता असे दिसुन येते की, आर.सी.सी. पायावर अंदाजे ४ फुटाचे बांधकाम झालेले आहे. आज रोजी दावा मिळकतीच्या मध्ये वादींच्या कथनानुसार सुरु असलेले बांधकामाबाबत उभय बाजुंना मान्य असलेली वस्तुस्थिती अभिलेखावर आलेली नाही. खुल्या न्यायालयात दोन्ही वकीलांना आजची दावा मिळकतीची परिस्थितीची छायाचित्रे हजर करण्यास सांगितले असता त्यांनी सदर छायाचित्रे हजर करु शकत नाही असे सांगितले. न्यायालयाच्या अभिलेखावर आज रोजी सदर बांधकामाबाबत कोणती परिस्थिती आहे हे न येता जैसे थे आदेश पारीत केल्यास गुंतागुंत वाढण्याची शक्यता आहे. सबब, सदरचा अर्ज नामंजूर करण्यात येतो. प्रतिवादी क्र.१ यांनी दिनांक ०३/१२/२०२२ रोजी निशाणी क्र.५ च्या अर्जास म्हणणे द्यावे अन्यथा निशाणी क्र.५ चा अर्ज त्यांच्या म्हणण्याशिवाय चालविण्यात येईल.

सही/–
**(एस. एस. पाटील)**
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, महाड

महाड
दिनांक – ०१/१२/२०२२